MHWS090004662026

:: <u>नि.क्र. ०१ वरील आदेश</u> ::

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार भोला मंगु राठोड यांनी पोलिस स्टेशन आसेगांव, ता.मंगरुळपीर, जि.वाशिम यांच्याकडील गुन्हा क्र.१२३/२०२६ भारतीय न्याय संहिताचे कलम १८९(२), १९१(२), ३३३, ३२४(४), ३५२, ३५१(२)(३) मधील जप्त मुद्देमाल NAHINDRA MAXXIMO MINI VAN चारचाकी वाहन नोंदणी क्र.MH-06/BE-2174, चेसिस नं.MA1FC2MCRC8L44980, इंजिन नं.MCC6L40502 परत मिळणेसाठी केला आहे.

२. यासंदर्भात तपास अधिकारी व सरकारी वकिलांचे म्हणणे मागविण्यात आले. सरकारी वकिलांनी सदर अर्जास विरोध केला आहे. त्यांचे म्हणणेप्रमाणे सदर जप्त वाहन पुराव्याकामी हजर करण्यात आले असुन ते महत्वाचा पुरावा आहे. सदर वाहनाचा रंग, स्वरुप, ओळख बदल करण्याची दाट शक्यता असल्यामुळे अर्जदारास सदरचे वाहन सुपुर्तनाम्यावर देण्यास आक्षेप नोंदविला आहे. तसेच तपास अधिकारी यांनी नि.५ वर सरकारी वकिलांनी दिलेल्या म्हणण्याप्रमाणेच त्यांचे देखील म्हणणे दिले आहे. त्यात त्यांनी अर्जदाराचे जप्त वाहन सुपुर्तनाम्यावर न देण्याबाबत विनंती केली आहे.

३. अर्जदाराने दस्त यादी नि.३ सोबत प्रथम खबर अहवालाची छायांकित प्रत, आर. सी बुक ची प्रमाणित प्रत, तसेच अर्जदाराचे आधार कार्डची प्रमाणित प्रत असे कागदपत्र दाखल केलेले आहेत. सदर चारचाकी वाहना संबंधित कागदपत्रावरुन जप्त वाहन हे अर्जदाराच्या मालकीचे असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होते.

४. तसेच अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, अर्जदाराच्या व्यतिरीक्त सदर जप्त वाहन परत मिळण्यासाठी इतर कुणीही अर्ज दाखल केला नाही. त्यामुळे अर्जदाराचा सदर वाहन मालकी निर्विवाद आहे. वास्तविक, खटल्याच्या निकालास बराच विलंब लागण्याची शक्यता विचारात घेता सदर जप्त वाहनाचा ताबा अर्जदाराला देणे योग्य होईल. सदर वाहन हे मशिनरी असल्यामुळे पडुन राहिले तर ते खराब होण्याची किंवा गंजण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर चारचाकी वाहनाचा तात्पुरता ताबा अर्जदाराला देणे नाकारता येणार नाही. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या *'सुंदरभाई अंबालाल देसाई वि. गुजरात सरकार (२००२ (३) एस.सी.सी.२८३)* या खटल्यातील निर्देशानुसार

अशा प्रकारच्या जप्त मुद्देमालाची लवकरात लवकर विल्हेवाट लावण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे सदरचा जप्त मुद्देमाल अर्जदार यांना योग्य ते बंधपत्र घेवून व योग्य त्या अटी शर्तीनुसार परत करणे न्यायोचित ठरेल. त्यामुळेच खालील अटी शर्तींच्या अधिन राहुन अर्ज मंजुर करण्याजोगा आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. पोलिस स्टेशन, आसेगांव ता. मंगरुळपीर जि. वाशिम अंतर्गत नोंद गुन्हा क्र.१२३/२०२६ भारतीय न्याय संहिताचे कलम १८९(२), १९१(२),३३३, ३२४(४),३५२, ३५१(२)(३) मधील जप्त मुद्देमाल NAHINDRA MAXXIMO MINI VAN चारचाकी वाहन नोंदणी क्र.MH-06/BE-2174, चेसिस नं.MA1FC2MCRC8L44980, इंजिन नं.MCC6L40502 चा अंतरीम ताबा रु. ७,००,०००/-(रुपये सात लाख फक्त) च्या क्षतीपुर्ती बंधपत्रावर अर्जदार **भोला मंगु राठोड,** रा. जगदंबानगर, ता.मानोरा, जि.वाशिम यांना खालील अटी शर्तीच्या आधारे देण्यात यावा.

अ) अर्जदार यांनी न्यायालयाच्या परवानगीशिवाय किंवा खटला निकाली निघे पावेतो सदर जप्त वाहनाची वाहनाची कोणत्याही प्रकारची विक्री किंवा इतर कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करु नये. तसेच सदर जप्त वाहनाचा रंग किंवा इतर प्रकारे कोणत्याही प्रकारचा फेरबदल करु नये.

ब) अर्जदार यांनी सदर जप्त वाहन आवश्यकता असेल तेंव्हा न्यायालयासमोर हजर करावे.

ड) तपास अधिकारी यांनी जप्त चारचाकी वाहनाचा ताबा अर्जदारास देतांना अर्जदाराच्या खर्चाने जप्त चारचाकी वाहनाचे छायाचित्रे काढून व योग्य तो पंचनामा तयार करुन अर्जदाराला ताबा द्यावा. त्यानंतर तपास अधिकारी यांनी प्रस्तुतचा सुपुर्तनाम्याचा अहवाल, छायाचित्रे, पंचनामा व उपरोक्त क्षतीपुर्ती बंधपत्र दोषारोपपत्रासोबत न्यायालयात दाखल करावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by JAGDISH TULSIDAS KOREGAONKAR
Date: 2026.06.12 17:37:09 +0530

मानोरा
दि. १२.०६.२०२६

(ज. तु. कोरेगांवकर )
न्यायदंडाधिकारी (प्र.श्रे.)
(न्यायालय क्र.१) मानोरा,

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Smt. R. K. Chavhan(Grade-III) |
| Court Name | :- | (Shri. J. T. Koregaonkar)<br>(Civil Judge (Jr.Dn.) and J.M.F.C., Manora. Dist. Washim. |
| Date | :- | 12/06/2026 |
| Order signed by the presiding officer on | :- | 12/06/2026 |
| Order uploaded on | :- | 12/06/2026 |